दि.२०/०९/२०२२.     प्रकरण क्रं. :— २८१/पीडब्ल्यू/२०२१

निशाणी क्रं. :— १६

साक्षीदार क्रं. :— २

माझे नाव :— योगेश नामदेव बच्चे.

वय :— ३३ वर्षे. कामधंदा :— पोलीस शिपाई ब. क्र. २२७३ सलग्न मुंबई सेंट्रल रेल्वे पोलीस ठाणे.

सध्या राहणारा :— मुंबई.

सरतपास स. स. अभियोक्ता श्रीमती शेख नाजिया नुरूल अमीन यांच्या मार्फत

दि.२६/०४/२०२१ रोजी, माझी गुन्हे प्रकटीकरण पथकामध्ये डयुटी होती. त्या दिवशी मुंबई सेंट्रल ते माहिम या हदद्दीमध्ये गुन्ह्यांना प्रतिबंध करण्याकामी आम्हांला वरिष्ठांचे आदेश होते. आरोपी हा गुन्हा नोंद क्रमांक ४८/२०२१ मध्ये अटक होता. त्यावेळी तपासीक अंमलदार यांनी आरोपीला विश्वासात घेवून विचारपूस केली असता आरोपीने गुन्हा नोंद क्रमांक ५०७/२०२० या गुन्ह्याची देखील कबूली दिली.

२. त्यानंतर आरोपीने दिलेल्या निवेदनाप्रमाणे त्याच्या राहत्या घरातून भायखळा, फळ बाजार, गाळा क्र. १३२ मधून, १० ग्रॅम वजनाची सोन्याची चेन काढून दिली. तपासीक अंमलदार यांनी माझे तपास टिपन घेतले होते. मी आरोपीला ओळखू शकतो. आरोपी आज न्यायालयात हजर नाही.

सरतपास संपला.

उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री हरिष व्होरा यांच्यामार्फत

३. आरोपीला मूळ गुन्हा नोंद क्रमाक ४८/२०२१ मध्ये दि. २६/०४/२०२१ रोजी, १३.०५ वाजता अटक केली. आरोपीने

काढून दिल्याप्रमाणे आरोपीकडून जप्त केलेली सोन्याची चेन तुटलेल्या अवस्थेत होती. निवेदन पंचनामा माझ्या समक्ष लिहिला होता. जप्त केलेली सोन्याची चेन तुटलेल्या अवस्थेत होती, असे तपासीक अंमलदार यांनी निवेदन पंचनाम्यामध्ये नमूद केले नाही. साक्षीदाराला निवेदन पंचनामा दाखविल्यामूळे सदर निवेदन पंचनाम्याला (नि. क्र. १६) देण्यात येत आहे. तपासीक अंमलदार यांनी आरोपी ज्या ठिकाणी आम्हांला घेवून गेला होता त्या ठिकाणच्या आजू बाजूच्या स्वतंत्र साक्षीदारांचे जबाब घेतले होते किंवा कसे, हे मला आठवत नाही.

४. आरोपीने कोणत्याही प्रकारचा मुददेमाल काढून दिला नव्हता, हे म्हणने खरे नाही. तपासीक अंमलदार यांनी त्यांना पाहिजे तसे माझे तपास टिपन लिहून घेतले होते, हे म्हणने खरे नाही. जप्त मुददेमाल आज रोजी न्यायालयासमक्ष नाही.

उलटतपास संपला.

फेर तपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत
समक्ष
स्वाक्षरी/—
(भा. कि. गावंडे)
दि. २०/०९/२०२२. महानगर दंडाधिकारी, ३६वे न्यायालय,
सराद. मुंबई सेंट्रल, मुंबई.